आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ डिसेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या सर्व २८५ नगरपालिकांच्या निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबरला करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाचे आदेश /२२२ नगरपालिकांसाठी उत्साहात मतदान

- घोषित केलेल्या निवडणुका पुढं ढकलल्या जाणं हे यंत्रणांचं अपयश असल्याची मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रीया, विरोधकही नाराज

- मतदार याद्यांचं पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन संसदेत गदारोळ, लोकसभेचं  कामकाज दिवसभरासाठी स्थगित.

- नाशिकच्या महाविद्यालातल्या सहलीच्या बसचा कराडजवळ अपघात ४५ जण जखमी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ५०४ अंकांची घसरण

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं दिले आहेत. सुरवातीच्या कार्यक्रमानुसार या सर्व जागांसाठी आज मतदान होणार होतं, मात्र न्यायालयीन अपील झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये २० डिसेंबरला मतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला. यामध्ये २४ नगराध्यक्ष आणि २०४ सदस्यांच्या जागांचा समावेश आहे.

सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत, अन्यथा २० डिसेंबरला होणाऱ्या निवडणूक होणाऱ्या जागांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठासमोर आली होती. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयानं सर्व ठिकाणचे निकाल २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले. या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० डिसेंबरचं मतदान संपल्यानंतर अर्धा तासानं जाहीर करता

येतील, आणि निवडणूक आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या २२२ नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी आज मतदान झालं. ऐकूया त्याबाबतचा वृत्तांत...

**- - - व्हॉईस कास्ट- --**

*(संपूर्ण राज्यातली अंतिम आकडेवारी अद्याप हाती आलेली नाही. मात्र दुपारी साडे तीन वाजेपर्यंत* ***कोल्हापूर*** *जिल्ह्यात ६१ पूर्णांक ९९ शतांश टक्के मतदान झालं.*

***सिंधुदुर्ग*** *जिल्ह्यात ५९ पूर्णांक ६१ शतांश टक्के.*

***रायगड*** *जिल्ह्यात ५४ पूर्णांक ९ दशांश*

***रत्नागिरी*** *- ५८ पूर्णांक ३१ शतांश*

***पालघर*** *- ४४ पूर्णांक २२ शतांश*

***सांगली*** *- ५७ पूर्णांक ८६ शतांश*

***सातारा*** *- ४९ पूर्णांक १४ शतांश*

***छत्रपती संभाजीनगर*** *- ५५ पूर्णांक ३७ शतांश*

***जालना*** *- ५४ पूर्णांक १९ शतांश*

***लातूर*** *- ५३ पूर्णांक ५९ शतांश*

***नांदेड*** *- ५३ टक्के*

***धाराशिव*** *- ५३ पूर्णांक ८६शतांश*

***नागपूर*** *- ४५ पूर्णांक ९५ शतांश*

***अमरावती*** *- ४९ पूर्णांक ८ दशांश*

***बुलडाणा*** *- ४९ पूर्णांक ४ दशांश*

***वाशिम*** *- ४६ पूर्णांक ५३ शतांश*

***अकोला*** *- ५१ पूर्णांक ३१ शतांश*

*तर*

***नंदुरबार*** *जिल्ह्यात ४६ पूर्णांक ९२ शतांश टक्के मतदान झालं.*

***बीड** जिल्ह्यात परळी नगरपरिषदेत ४९ पूर्णांक ३८ शतांश टक्के, अंबाजोगाई - ५२ पूर्णांक ९२ शतांश, गेवराई ५६ पूर्णांक ४५ शतांश, किल्ले धारूर ५३ पूर्णांक ३२ शतांश, बीड ४६ पूर्णांक ८५ शतांश, तर माजलगाव नगरपरिषदेत ५६ पूर्णांक ८७ शतांश टक्के मतदान झालं.)*

यवतमाळ जिल्ह्यात 9 नगर परिषदा आणि एका नगरपंचायतीसाठी आज मतदान झालं. निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमामुळे यवतमाळ नगर परिषदेची निवडणूक 20 डिसेंबर रोजी होणार आहे. आज उमरखेड, पुसद, दारव्हा, दिग्रस, नेर, वणी, घाटंजी, आर्णी, पांढरकवडा या नगर परिषदा, तसंच ढाणकी या नगरपंचायतीसाठी मतदान झालं.

**<><><><>**

घोषित केलेल्या निवडणुका पुढं ढकलल्या जात आहेत, हे यंत्रणांचं अपयश असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. यावर आपण याआधीही नाराजी व्यक्त केल्याचं त्यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

तर न्यायालयाच्या या आदेशामुळे निवडणुकीचा खेळखंडोबा झाला असून, याला राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><>**

चैत्यभूमीवर उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात एक समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत ते बोलत होते. महापरिनिर्वाण दिनासाठी सुरक्षेसह सेवा सुविधांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. महापरिनिर्वाण दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या पोस्टरचं अनावरण आणि माहिती पुस्तिकेचं प्रकाशनही मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा मुद्दा दोन्ही सभागृहात गाजला. या विषयावर तातडीने चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे दोन्ही सभागृहांचं

कामकाज दिवसातून दोन वेळा तहकूब झालं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी शांततेचं आवाहन केल्यानंतरही विरोधक चर्चेसाठी आग्रही राहिले. त्यामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी दोननंतर, तर राज्यभेत आजचं नियोजित कामकाज झाल्यावर सभागृह दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

त्याआधी सखोल पुनरीक्षणावर तातडीनं चर्चा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षांनी लावून धरली. लोकशाही आणि नागरिकांच्या हितासाठी ही चर्चा होणं गरजेचं आहे, असं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

तर विरोधकांच्या घोषणाबाजीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली. सरकार सर्व विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी तयार आहे. मात्र सगळ्या चर्चा आत्ताच व्हाव्यात हा विरोधकांचा अट्टाहास योग्य नाही, नवे नवे मुद्दे शोधून संसदेच्या कामकाजात अडथळा आणणं बरोबर नाही असं रिजिजू संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

**- होल्ड बाईट किरेन रिजीजू - -**

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या पिंपळगाव बसवंतच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या बसला आज कराड जवळ झालेल्या अपघातात ४५ विदयार्थी आणि शिक्षक जखमी झाले. वाठार पुलाजवळ या बसचं संतुलन बिघडून ती २० फूट खोल दरीत कोसळली. जखमींना कराड इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ५०४ अंकांची घसरण झाली आणि तो ८५ हजार १३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १४४ अंकांची घसरण होऊन तो २६ हजार ३२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेच्या वित्त आणि पत धोरण समितीची द्वैमासिक बैठक उद्यापासून सुरु होईल. येत्या शुक्रवारी बैठक संपल्यावर गव्हर्नर संजय मल्होत्रा पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करतील.

या आधीच्या दोन आढाव्यांमधे व्याजदरात बदल झालेला नाही. यावेळी पाव टक्के कपात होण्याची शक्यता तज्ञ वर्तुळात व्यक्त होत आहे.

<><><><><>

नाशिक महानगरपालिकेच्या एनएमसी क्लीन गोदावरी हे कर्जरोखे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते सूचीबद्ध करण्यात आले. या कर्जरोख्यांच्या माध्यमातून नाशिक महानगरपालिका २०२७ साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी २०० कोटी रुपये उभारणार आहे.  राज्यात अशा प्रकारे आपले कर्जरोखे काढणारी नाशिक ही तिसरी महापालिका ठरली असून पायाभूत सुविधासाठी बॉण्ड द्वारे वित्त पुरवठा करणं हे महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

<><><><><>

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यपालांचं निवासस्थान असलेल्या राजभवनचं नाव आता ‘महाराष्ट्र लोकभवन’ करण्यात आलं आहे. महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत. ‘लोकभवन’ म्हणून ओळखलं जाणारं राज भवन आता केवळ राज्यपालांचं निवासस्थान आणि कार्यालय न राहता, राज्यातले नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद आणि सहभाग यांचं एक केंद्र व्हावं, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

<><><><><>

मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरच्या सीवूड्स दारावे या रेल्वे स्थानकाच्या नावात बदल करण्यात आला आहे. या स्थानकाचं नाव आता सीवूड्स दारावे करावे असं होणार आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. राज्यात याकाळात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

//<><><><><>//